-: प्रेसनोट दिनांक - ०७/०३/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक बाळासाहेब मारुती कांबळे, वय-५३, विस्तार अधिकारी, पंचायत समिती,पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर वर्ग-३ यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार हे सातवे ग्रामपंचायत कार्यालय, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. सातवे ग्रामपंचायतीचे उपसरपंच माणिक पाटील यांनी चौदाव्या वित्त आयोगा मधील मंजुर कामे ही दुस-याच्या नावांवर कंत्राट घेवून ते स्वत: करीत असलेबाबत त्यांच्याविरुध्द मा.गटविकास अधिकारी, पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचेकडे तक्रार झाली आहे. त्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचायत समिती पन्हाळा येथील विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांची गट विकास अधिंकारी पन्हाळा यांनी चौकशी अधिकारी म्हणून नेमणुक केली होती.

तक्रारदार हे दिनांक ०२/०३/२०१९ रोजी सांगली येथे गावी जात असताना पंचायत समिती येथील विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांनी तक्रारदार यांची भेट घेवून मी मा.गट विकास अधिकारी पन्हाळा यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे सातवे गावचे उपसरपंच माणिक पाटील यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीप्रमाणे शहानिशा करणेकरीता दिनांक ०६/०३/२०१९ रोजी येणार आहे. त्यावेळी कामाच्या प्रक्रियेमध्ये त्रुटी झालेल्या आढळून आल्यास, तुमच्या विरुध्द देखील कारवाई करणेबाबतचा अहवाल मला पाठवून द्यावा लागेल. तसे करायचे नसेल तर तुम्ही दोघांनी मिळून मला १०,०००/- रुपये द्या असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना कामामध्ये कोणत्याच त्रुटी झालेल्या नाहीत असे सांगून देखील त्यांनी काही ऐकूण न घेता रुपये १०,०००/- न दिल्यास, तुमच्या विरुध्द अहवाल पाठविण असे सांगून १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०५/०३/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयाकडे विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांचेविरुध्द तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक ०६/०३/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे सातवे ग्रामपंचायतीचे उपसरपंच माणिक पाटील यांनी चौदाव्या वित्त आयोगा मधील मंजुर कामे ही दुस-याच्या नावांवर कंत्राट घेवून ते स्वत: करीत असलेबाबत झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आरळे ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायतीमध्ये माणिक पाटील यांचेकडून विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांनी लागलीच ५,०००/- रुपये घेतले आणि तक्रारदार यांच्याकडे राहिलेले ५०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम घेवून आज दिनांक ०७/०३/२०१९ रोजी पन्हाळा पंचायत समितीच्या कार्यालयामध्ये घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक ०७/०३/२०१९ रोजी विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांचेविरुध्द पंचायत समिती पन्हाळा येथे सापळयाचे आयोजन केले असता विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांनी तक्ररदार यांना जयसिंगपूर एस.टि. स्टॅन्डवर बोलवून घेतलेने लागलीच जयसिंगपूर एस.टि.स्टॅन्ड येथे सापळयाचे आयोजन केले असता, विस्तार अधिकारी बी.एम.कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडून जयसिंगपूर एस.टि.स्टॅन्ड परिसरातील यश जेन्टस् पार्लर जवळ पंच साक्षीदार यांचे समक्ष ५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द जयसिंगपूर पोलीस ठाणे, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.दिलीप बोरस्ते, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शना नुसार, श्री.गिरीष गोडे, पोलीस उपअधीक्षक, श्री.मारूती पाटील, पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार शाम बुचडे, पोलीस नाईक शरद पोरे व पोलीस कॉन्स्टेबल मयुर देसाई, रुपेश माने ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री क्रमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.गिरीष गोडे , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ८१०८६६०७०७
०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक :- १०६४.

५) व्हॉटस अप क्रमांक :- ७८७५३३३३३३